महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : २६

# महाराजा सयाजीराव आणि मराठी भाषा, साहित्य व संस्कृती

## निलोफर मुजावर



महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : २६

# महाराजा सयाजीराव
# आणि
# मराठी भाषा, साहित्य व संस्कृती

निलोफर मुजावर

महाराजा सयाजीराव आणि
मराठी भाषा, साहित्य व संस्कृती
इतिहास
निलोफर मुजावर
●
प्रकाशन क्रमांक - ४६
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : निलोफर मुजावर
टी. के. आय. ई. टी स्टाफ निवास
कॉलेज रोड, वारणानगर
ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर १६११३
मो.८९५६५८१६०९
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : ३२ रुपये

---

- मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
  संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
- या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
  कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
- **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/**
  **101507596(1) - 14-02-2019**
- **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/**
  **1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव**
**ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड**
**सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**

●●●



# महाराजा सयाजीराव आणि मराठी भाषा, साहित्य व संस्कृती

मानवी संस्कृतीचा परिपूर्ण विकास हा राज्यकर्त्यांच्या धोरणावर अवलंबून असतो. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती याबाबत केलेले काम हे इतके मूलभूत आहे की या क्षेत्रात इतका संतुलित, चौफेर विचार आणि विकास करणारा प्रशासक जगाच्या इतिहासात फारच अपवादात्मक ठरेल. पाककला, लोकसाहित्य,व्यायाम, कृषी यासह अनेक विषयांवरील माहिती आणि ज्ञान केंद्रस्थानी ठेवून मराठीतील पहिला ग्रंथ निर्मितीचा मान ज्यांना जातो ते महाराजा सयाजीराव गायकवाड मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीचे आजवरचे सर्वात मोठे पाठीराखे होते. १८०० हून अधिक मराठी ग्रंथांचे प्रकाशन महाराजा सयाजीरावांनी केले होते. म्हणूनच मराठीतील एक महत्त्वाचे प्रकाशक बाबा भांड म्हणतात, “सयाजीराव महाराजांएवढा मोठा प्रकाशक गेल्या शतकात झाला नाही.”

फक्त आपले संस्थानच नव्हे तर आपले राष्ट्रही ज्ञानसंपन्न, वैज्ञानिक दृष्टीचे बनावे आणि काळाबरोबर उत्क्रांत होत जगातील प्रगत राष्ट्रांच्या पंगतीत बसावे ही विशाल दृष्टी ठेवून आपली ६४ वर्षांची कारकीर्द राबविणाऱ्या सयाजीरावांच्या जवळपास जाऊ शकेल असा एकही प्रशासक अथवा राज्यकर्ता आधुनिक भारताच्या इतिहासात सापडत नाही. त्यांच्या या विशाल दृष्टीचा सर्वाधिक लाभ महाराष्ट्राने घेतला याची साक्ष देणारी शेकडो उदाहरणे सापडतात. परंतु महाराष्ट्रातील प्रबोधन परंपरेचा अभ्यास करणारे अभ्यासक आणि इतिहास संशोधक मात्र त्यांना 'ते बडोद्याचे होते' असे म्हणून गेली ६० वर्षे कोपराने मागे ढकलत आले. ही बाब पुरोगामी म्हणणाऱ्या महाराष्ट्राच्या गाफिलतेची साक्ष देते.

## यशवंतराव : सयाजीरावांचे वारसदार

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर सयाजीरावांचा वारसा कृतीत आणणाऱ्या यशवंतराव चव्हाणांनी घेतलेला पहिला निर्णय म्हणजे १९ नोव्हेंबर १९६० महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाची स्थापना होय. अशा प्रकारची संस्था स्थापन करणारे महाराष्ट्र हे भारतातील पहिले राज्य होते. हे मंडळ म्हणजे महाराजांनी बडोद्यात मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीच्या संवर्धनासाठी केलेल्या विविध प्रयत्नांचे एकत्रीकरण होते. १९६३ च्या सयाजीरावांच्या

जन्मशताब्दीच्या पार्श्वभूमीवर यशवंतरावांनी या मंडळातर्फे १९६२ मध्ये महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या समग्र साहित्याचे प्रकाशन महाराष्ट्र शासनाने करावे असा निर्णय घेतला.

महाराजांनी त्यांच्या कारकीर्दीत एकूण ७ साहित्य संमेलनांत अध्यक्ष म्हणून केलेली भाषणे त्यांची साहित्यविषयक समज, सर्वसमावेशक दृष्टी आणि वैश्विक भान याची साक्ष देतात. या ७ संमेलनांमध्ये ४ मराठी व गुजराती, संस्कृत आणि हिंदी अशा प्रत्येकी १ भाषिक संमेलनांचा समावेश होतो. १८७८ पासून आयोजित होणाऱ्या मराठी ग्रंथकारांच्या संमेलनास १९०९ पर्यंत 'मराठी ग्रंथकारांचे संमेलन'असे नाव होते. १९०९ मध्ये बडोद्यातील संमेलनावेळी हे नाव बदलून 'मराठी साहित्य संमेलन'असे व्यापक नामाभिधान करण्यात आले. मुंबई येथील वनस्पतिशास्त्रज्ञ आणि लेखक के. आर. कीर्तिकर हे या संमेलनाचे अध्यक्ष होते. विशेष नोंद घेण्यासारखी बाब म्हणजे कीर्तिकर हे मराठी साहित्य संमेलनाचे पहिले ब्राह्मणेतर अध्यक्ष होते. बसता-उठता पुरोगामित्वाचे ढोल वाजवणाऱ्या आणि ब्राह्मणेतर चळवळीची 'पंढरी' असणाऱ्या महाराष्ट्राला हा इतिहास नवा आहे. म्हणूनच महाराष्ट्राने आपला पुरोगामित्वाचा 'डी.एन.ए.'बडोद्याच्या 'सयाजी लॅबोरेटरी'मध्ये तातडीने तपासून घेणे आरोग्यदायी ठरेल.

## दामोदर यंदे

मराठा जातीतील दामोदर सावळाराम यंदे हे मराठी भाषेतील पहिले सर्वात मोठे प्रकाशक होते. मराठीला वैचारिकदृष्ट्या समृद्ध करणारे अत्यंत मौलिक ग्रंथ यंदे यांनी महाराजांच्या आश्रयाने बडोद्यातून प्रकाशित केले. त्यामुळे मराठी साहित्य,समाज आणि संस्कृतीचे आधुनिकीकरण करण्यासाठी ज्या प्रकाशकांचा मुख्य वाटा आहे त्यामध्ये यंदे हे सूत्रधाराच्या भूमिकेत आहेत. महाराष्ट्रातील विद्वानांनाही 'हे यंदे कोण?' हा प्रश्न पडत असेल तर महाराष्ट्राचे आजचे 'ज्ञानवास्तव' आपल्या प्रबोधन परंपरेची पुनर्मांडणी करण्याची प्रेरणा देणारे ठरेल.

मातृभाषेतील शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊन सयाजीरावांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या मातृभाषेतून शिक्षण देण्याचे धोरण अवलंबिले. परंतु सर्व अभ्यासक्रम मराठीतून उपलब्ध करणे शक्य नसल्याने निरनिराळ्या शिक्षकांनी,अभ्यासकांनी व तज्ज्ञ गृहस्थांनी आपापल्या विषयावर सोपे आणि परिपूर्ण ग्रंथ लिहून परभाषेवरील अवलंबित्व दूर करण्याचे आवाहन सयाजीरावांनी केले. यानुसार १९३० मध्ये प्रा.बा.प्र. मोडक यांनी 'पदार्थविज्ञान', प्रा.मा.क. भाटवडेकर यांनी 'वनस्पतिशास्त्र' तर प्रा.मो.के. दामले यांनी 'सृष्टिशास्त्र' या पुस्तकामध्ये त्या काळापर्यंतच्या विविध शोधांची माहिती करून दिली आहे.

मा.धो. खांडेकर यांनी नीतिशतक, शृंगारशतक आणि वैराग्यशतक या तिन्ही संस्कृत रचनांचे मराठी भाषेत सार

सांगणारा ‘नीतिकाव्यामृत’ हा प्रसिद्ध ग्रंथ लिहिला. १९३३ मध्ये ‘नीतिशास्त्र प्रबोधन’ हा भारतीय नीतिमत्तेचे आणि पाश्चिमात्य नीतिमत्तेचे तुलनात्मक विवेचन करणारा ग्रंथ रचला.

## रियासतकार सरदेसाई

महाराजांमुळेच रियासतकार म्हणून खरी ओळख मिळालेले गो.स सरदेसाई आपल्या लेखनकार्याचे सर्व श्रेय महाराजांना देतात. १८८० मध्ये सरदेसाई यांनी इंग्लंड, ग्रीस आणि हिंदुस्थान या देशांच्या अर्वाचीन इतिहासावरील ग्रंथ लिहिले. तसेच ‘मराठी राजवट’या ग्रंथात त्यांनी पेशवेकालीन महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर असलेल्या मराठी राजवटींची चर्चा केली आहे. बडोदा संस्थानचे पहिले मराठी लष्करप्रमुख जनरल नानासाहेब शिंदे यांनी १९२० मध्ये भारताच्या इतिहासातील मोठ्या लढायांची रणनीती आणि शौर्याची माहिती ‘हिंदुस्तानचा लष्करी इतिहास आणि दोस्त राष्ट्रांच्या फौजा’ या पुस्तकात दिली आहे. हे मराठीतील पहिले व आजवरचे अशा प्रकारचे एकमेव पुस्तक आहे.

राजरत्न प्रो. माणिकराव यांनी १८०० शस्त्रांची विस्तृत माहिती देणारा ‘प्रतापशस्त्रागार’ हा ग्रंथ तसेच व्यायाम मंदिर, शरीरशास्त्र, मालिश, संघव्यायाम ही महत्त्वपूर्ण पुस्तके लिहिली. आबासाहेब मुजुमदार यांनी ‘व्यायाम’नावाचे सचित्र मराठी मासिक प्रकाशित केले. १९३६ ते १९४९ या काळात मुजुमदार यांनी मराठीतील आणि बहुधा कोणत्याही भारतीय भाषेतील

पहिला ‘व्यायामकोश’ हा अद्वितीय कोश दहा खंडात प्रसिद्ध केला. महाराजांनी पाकशास्त्र अभ्यासासाठी नामदेवराव रामचंद्रराव कदम यांना युरोपला पाठवले. शिक्षण पूर्ण करून परतताच त्यांनी ‘भोजनदर्पण’(१८९७) हा पाकशास्त्रावरील समृद्ध ग्रंथ लिहिला. महाराजांच्या हुकुमावरून बळवंतराव रामचंद्र मराठे यांनी ‘सूपशास्त्र’ या मराठी भाषेतील पुस्तकातून तंजावरी चालींच्या पदार्थांची माहिती करून दिली आहे.

## मराठीतील पहिले ग्रंथ

मराठीमध्ये स्वतंत्र अभ्यास संशोधन करून लेखन करणारे लेखक फारच कमी असल्यामुळे जगातील आधुनिक ज्ञान आपल्या प्रजेला मिळवून देण्याचा एकमेव मार्ग म्हणून महाराज भाषांतराकडे पाहात होते. १८८७ मध्ये महाराज जेव्हा पहिल्या परदेशवारीवर युरोपला गेले तेव्हा त्यांनी युरोपातून कॅसलचा ‘Dictionary of Cookery’ हा ग्रंथ मराठीत भाषांतर करण्याचे आदेश दिवाणांना दिले. मनिलाल द्विवेदी यांनी या योजनेअंतर्गतच पाटण येथील प्रसिद्ध जैन भांडारातील २१ ग्रंथांचे संशोधनात्मक भाषांतर केले होते. हीच भाषांतर शाखेची पहिली सुरुवात होय.

१८९३ मध्ये सर हेनरी मेन यांच्या ‘व्हिलेज कम्युनिटीज’ या ग्रंथाचे बोडस यांनी केलेले ‘प्राच्य व पाश्चात्य देशांतील ग्रामसंस्था’ हे मराठी भाषांतर तसेच १८९७ मध्ये विल्यम मॉरीसन यांच्या ‘क्राइम अँड इट्स कॉझिस’ या इंग्रजी ग्रंथाचे ‘गुन्हा आणि त्याचीं कारणें’ हे रामचंद्र हरी गोखले यांनी केलेले

मराठी भाषांतर ‘महाराष्ट्रग्रंथमाले’त प्रकाशित केले. १९२८ मध्ये ‘Tribe and Caste Of Bombay’ या पुस्तकाचे मराठी भाषांतर गोविंद मंगेश कालेलकर यांच्याकडून करून घेऊन ‘मुंबई इलाख्यातील जाती’ या नावाने सयाजीसाहित्य मालेत प्रकाशित केले.

प्रायश्चित्ताबाबत धर्मशास्त्र काय म्हणते हे लोकांना कळावे आणि त्यातून लोकांची धर्माबाबत साक्षरता वाढावी म्हणून १९०३ मध्ये भिकाचार्य ऐनापुरे यांच्याकडून ‘प्रायश्चित्तमयूख’ हा संस्कृत ग्रंथ व त्याचे मराठी भाषांतर या स्वरूपात तयार करवून प्रकाशित केला. हा ग्रंथ म्हणजे महाराजांच्या धर्मसाक्षरता अभियानाचा उत्तम नमुना आहे.

१९१५ मध्ये ‘गायकवाड ओरिएन्टल सिरिज’ ही संशोधनात्मक प्रकाशनमाला सुरू करण्याचे निश्चित केले. १९१६ मध्ये राजशेखरकृत ‘काव्यमीमांसा’ हा या मालेतील पहिला ग्रंथ प्रकाशित झाला. या मालेसाठी पाली भाषेतील बौद्ध धर्मावरील ‘दीघनिकाय’ ग्रंथाचे मराठी भाषांतर चिंतामण वैजनाथ राजवाडे यांनी केले. श्रावणमास दक्षिणेवर होणारा अवाजवी खर्च कमी करून झालेल्या बचतीतून दरवर्षी १० हजार रुपये धर्मशास्त्राच्या भाषांतरित पुस्तकांवर खर्च करण्याचे आदेश सयाजीरावांनी दिले. यातूनच “श्रीसयाजीशासनशब्दकल्पतरू” हा अष्टभाषी राज्यव्यवहार कोश प्रसिद्ध झाला.

## भाषांतराला पाठबळ

१ सप्टेंबर १९२७ रोजी बडोद्यात प्राच्यविद्या संस्थेची स्थापना करण्यात आली. सामान्य प्रजेला ज्ञानाचा लाभ मिळावा म्हणून उत्तम ग्रंथांचे गुजराथी व मराठीत भाषांतर करण्याचे काम सुरू झाले. १९३२ अखेर महाराजांनी भाषांतर शाखेसाठी दीड लाख रुपये खर्च केले होते. आजच्या रुपयाच्या मूल्यात ही रक्कम ४१ कोटी २५ लाख रु.हून अधिक भरते.

या संस्थेत हस्तलिखितांचा संग्रह, छापील किंवा प्रकाशित पुस्तके, समिक्षित आवृत्ती विभाग, भाषांतर विभाग असे एकूण चार विभाग आहेत. भाषांतर विभागांतर्गत हिंदूधर्मासोबतच जैन, बौद्ध, मुस्लिम, ख्रिश्चन धर्माची पुस्तके मराठी, गुजराती, हिंदीमध्ये भाषांतर करून धर्मांचा तौलनिक अभ्यास करण्यासाठी स्वतंत्र निधी उभारला. यातूनच "सयाजी साहित्यमाला", "सयाजी बाल ज्ञानमाला" इ. ग्रंथमाला सुरू करण्यात आल्या.

जुने खेळ नामशेष होऊ नयेत व पाश्चात्त्य खेळांची माहिती जनतेला मिळावी यासाठी सुरू करण्यात आलेल्या क्रीडा ग्रंथमालेत कालेलकरलिखित 'मराठी खेळांचे पुस्तक' हा महत्त्वपूर्ण ग्रंथ प्रकाशित झाला. लोकसाहित्यावरील मराठीतील पहिले पुस्तक म्हणजे आर.ए. एन्थोवेन यांच्या 'The Folklore of Bombay' या ग्रंथाचा गोविंद मंगेश कालेलकर यांनी केलेला 'लौकिक दंतकथा' हा मराठी अनुवाद सयाजीसाहित्य मालेत १९३४ मध्ये प्रकाशित करण्यात आला.

साहित्यमय झालेल्या बडोदा नगरीत ज्या अनेक साहित्यविषयक संस्था उदयास येत होत्या त्यापैकी एक मंडळ म्हणजे 'महाराष्ट्र वाङ्मयमंडळ' होय. पदार्थशास्त्रातील विद्युत या विषयावरील शब्दकोश या मंडळातर्फे तयार करण्यात आला. श्रीधर व्यंकटेश केतकर निर्मित महाराष्ट्रीय ज्ञानकोशाच्या २,००० रु. किमतीच्या प्रती सयाजीरावांनी विकत घेतल्या. आजच्या रुपयाच्या मूल्यात ही रक्कम ५६ लाख ३४ हजार रु.हून अधिक भरते. याच केतकरांना महाराजा सयाजीरावांनी अमेरिकेतील जातीवरील समाजशास्त्रीय संशोधनासाठी १९०६ ते १९१० अशी चार वर्षे शिष्यवृत्ती दिली होती.

## बडोद्यातील मराठी वृत्तपत्रे

बडोद्यात १८८५ मध्ये रामजी संतूजी आवटे आणि यंदे यांनी 'बडोदा वत्सल' हे साप्ताहिक तर १८९३ मध्ये दामोदर सावळाराम यंदे यांनी स्वतंत्रपणे 'सयाजीविजय' नावाचे मराठी साप्ताहिक सुरू केले. याबरोबरच बडोदा संस्थानात बडोदा गॅझेट, हिंदविजय, नवसारी प्रकाश, भारतमित्र इ. दैनिके व मासिकांचा उदयास्त होत राहिला. १२० वर्षापूर्वी महाराजांनी गुजराती प्रांतात मराठी भाषेची विविधांगी सेवा अखंडपणे केली जी सेवा करणे महाराष्ट्राला आजही शक्य झाले नाही.

मराठी रंगभूमीवरील बालगंधर्व आणि दादासाहेब फाळके या दोन अनमोल हिऱ्यांना पैलू पाडण्याचे काम महाराजांनी केले. १९१३ मध्ये बालगंधर्वांनी 'गंधर्व नाटक मंडळी'ची

स्थापना केली. रावसाहेब शिरगावकरांच्या शिफारशीवरून गंधर्व नाटक मंडळींना महाराजांनी राजाश्रय दिला. महाराजांच्या अटीनुसार गंधर्व नाटक मंडळी वर्षातून एक महिना बडोद्यास जायचे. महाराजांचा आश्रय मिळाल्यामुळे "श्री बडोदे सरकार यांच्या खास आश्रयाखाली" असा उल्लेख गंधर्व कंपनीच्या जाहिरातीवर झळकू लागला. बालगंधर्वांच्या बडोदा भेटीतील पहिला नाट्यप्रयोग राजवाड्यात खासगीत होत असे. प्रत्येकवेळी महाराज बालगंधर्वांच्या सन्मानार्थ एक हजार रुपये तर इतर सहकलाकारांना चार हजार रुपये देत असत. पुढे महाराजांकडून गंधर्व कंपनीला ५,००० रुपयांचे वर्षासन मिळू लागले. महाराजांविषयी बालगंधर्व आत्मचरित्राच्या टिपणात लिहितात-'अशी विशुद्ध, निरपेक्ष रसिकता आणि औदार्य आता दुर्लभच'.

## दादासाहेब फाळके

चित्रपटसृष्टीचे जनक दादासाहेब फाळके यांनी चित्रपट निर्मितीचे धडे बडोद्याच्या कलाभवनमध्ये गिरवले. त्याकाळी अद्ययावत डार्करूम, आधुनिक किमतीचे विलायतेतले कॅमेरे इ. तंत्रज्ञान कलाभवनात उपलब्ध असल्याने दादासाहेबांना या तंत्रज्ञानाचा पुरेपूर लाभ झाला. महाराजांनी दादासाहेब फाळकेंना लंडन येथील उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली. बडोद्यासंदर्भात आपल्या भावना व्यक्त करताना दादासाहेब म्हणतात, '... मला सयाजीराव महाराजांची राजधानी बडोद्याने

यशस्वी चित्रपट निर्मात्याचा विकास होण्यासाठी ज्या ज्या अंगभूत गुणांची जरूर असते ते मिळवण्यास खूप मदत केली. आज जे माझे वैभव आहे त्याचे श्रेय माझ्या बडोद्याच्या वास्तव्याला आणि तिथल्या कलाभवनच्या तंत्रज्ञानाला आहे.' महाराजांनी १९२९ मध्ये बडोद्यात पहिले चित्रपटगृह सुरू केले. पुढे तेच चित्रपटगृह शिवाजी-चित्रभवन व नंतर प्रिन्स टॉकीज या नावाने प्रसिद्ध झाले.

साहित्यसम्राट न.चिं. केळकर यांच्या सात नाटकांवरचा अभ्यासपूर्ण प्रबंध, प्रा.वि. पा. दांडेकर यांनी लिहिलेली 'फेरफटका टेकडीवरून', 'काळ खेळतो आहे', 'एक पाऊल पुढे' असे लघुनिबंध बडोद्यातून प्रकाशित झाले.

## संगीत कला

विष्णू नारायण भातखंडे हे हिंदुस्थानी संगीताचे संशोधक, संगीतकार आणि प्रख्यात गायक होते. त्यांनी हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताच्या वर्गीकरणाची 'थाट पद्धत' विकसित केली. भातखंडे या संगीत शास्त्रज्ञांनी एक नवीन पध्दतीचे स्वरलेखन अथवा नोटेशन तयार केले होते, महाराजांनी हे नोटेशन बडोद्यात गायनशाळांतून चालविण्याची व्यवस्था केली होती. त्याचबरोबर महाराजांनी भातखंडे यांच्याकडून गायनशास्त्रावर पुस्तके तयार करवून घेतली.

भातखंडे यांनी हिंदुस्थानात सर्व प्रांतात फिरून गायनशास्त्रातील प्राचीन ग्रंथ मिळवून त्याचा अभ्यास करून

ग्रंथ लिहिले. यातील ‘संस्कृत लक्षसंगीत’ या ग्रंथात प्रचलित हिंदुस्थानी संगीतातील रागाची संपूर्ण माहिती देऊन त्याबद्दल चर्चा केली आहे. ‘संस्कृत अभिनवरागनंजिरी’, ‘हिंदुस्थानी संगीत पध्दती भाग १-४’, ही पुस्तके मराठीत असून यात रागाचे उत्तम विवरण केले आहे. ‘हिंदुस्थानी संगीत क्रमिक पुस्तकमाला भाग १-४’, या पुस्तकात हिंदुस्थानातील प्रसिध्द गवैयांच्या उत्कृष्ट चिजा नोटेशनसह निरनिराळ्या रागात आणि तालात दिलेल्या आहेत. ही पुस्तके हिंदुस्थानातील सर्व भागातल्या संगीत पाठशाळेतून क्रमिक पुस्तके म्हणून आजही वापरली जातात. बडोदा गायन शाळेचे शिक्षक शिवराम सदाशिव मनोहर यांनी नाटकांच्या पदांचे नोटेशन असणारे पुस्तक 'संगीत शाकुंतल' हे पुस्तक लिहिले.

भातखंडे आणि पंडित दत्तात्रय विष्णू पलुसकर हे महाराजांनी भरविलेल्या पहिल्या संगीत परिषदेत हजर होते. परंतु या परिषदेत इंग्रजी भाषेचा वापर जास्त केला गेला होता. हे पलूसकरांना आवडले नाही. त्यांच्या मताप्रमाणे गायन परिषद सर्वांना समजेल अशा भाषेत व्हायला हवी होती. बऱ्याच गायकांना इंग्रजी भाषा येत नव्हती. त्यामुळे ते तिथे रमले नाहीत असे संदर्भ सापडतात. परंतु महाराजांनी त्यांना व भातखंडेंना कलाभवनच्या औपचारिक तपासणीसाठी बोलावले होते व हे दोघेही तेव्हा बडोद्यात येऊन कलाभुवनाचे संगीत विभागाची तपासणी करून गेले होते.

सयाजीराव महाराजांना पहिल्या राणी चिमणाबाईंच्या मृत्यूनंतर निद्रानाशाचा आजार जडला. त्यावर अनेक उपाय करूनही फारसा उपयोग झाला नाही. परंतु कोल्हापूरच्या लक्ष्मीबाई जाधव यांचे गाणे ऐकून महाराजांना चांगली झोप लागू लागली. लक्ष्मीबाई जाधव या १९२२ ते १९४५ पर्यंत बडोदा दरबारात गायिका म्हणून कार्यरत होत्या. बडोद्यातील त्यांच्या यशस्वी कामगिरीमुळे त्यांना 'लक्ष्मीबाई बडोदेकर' या नावाने ओळख मिळाली. कोल्हापूरच्या क्षात्रपीठाचे जगद्गुरू डॉ. कुर्तकोटींनी त्यांना 'संगीतचंद्रिका' ही पदवी बहाल केली.

रुग्णांना दवाखान्यात संगीत ऐकवले तर त्यांच्या तब्येतीत लवकर सुधारणा होऊ शकेल या गृहीतकानुसार बडोद्याच्या हॉस्पिटलमध्ये फय्याज खाँ यांना गायन करण्याचे आदेश महाराजांनी दिले. संगीताचा रुग्णाच्या आरोग्याशी संबंध जोडून महाराजांनी एक अभिनव प्रयोग केला. उस्ताद अब्दुल करीम खाँ आणि अब्दुल हक़ यांच्याकडून राजकुमार फत्तेसिंहराव जलतरंग हे वाद्य तर राजकुमार जयसिंहराव व शिवाजीराव हे दोघे उत्कृष्ट सतारवादन शिकले.

## फुले परंपरेचा विकास

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जडणघडणीत फुले-शाहू-आंबेडकर यांचा जो वाटा आहे त्यापेक्षा अधिक योगदान महाराजांचे आहे.फुल्यांचे समाजसुधारणेचे कार्य पूर्णत्वाकडे नेण्याचे काम महाराजांनी केले. 'शेतकऱ्यांचा असूड' या ग्रंथाच्या आरंभी

फुल्यांनी लिहिलेल्या,“विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली, नीतिविना गती गेली! गतीविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले.” या ओळींची पारायणे महाराष्ट्रात गेली १०० वर्षे सुरू आहेत, परंतु या ओळीतील विचार सत्यात उतरण्याचा यशस्वी प्रयत्न सयाजीरावांनीच केला.

महात्मा फुले यांनी बडोद्यामध्ये महाराजांसमोर आपल्या ‘शेतकऱ्यांचा असूड’ ग्रंथाचे जाहीर वाचन केले. महाराजांनी या पुस्तकाच्या छपाईसाठी केलेल्या आर्थिक मदतीचा उल्लेख या ग्रंथाच्या शेवटच्या पानावर येतो. १८९० मध्ये फुलेंचा मृत्यू झाला. मामा परमानंदांच्या शिफारशीवरून सावित्रीबाई आणि मुलगा यशवंत यांना १००० रु.चा चेक देताना महाराज धामणस्कर यांना म्हणाले, “जोतीबांचे स्मारक होणे जरूर आहे आणि ते करण्याचे कोणी मनावर घेत असल्यास स्मारक फंडासाठी मदत करण्याची माझी तयारी आहे.” यावरून महाराजांची फुलेंविषयी कृतज्ञता व्यक्त होते. तर महात्मा फुले जेव्हा महाराजांवर एक पत्ररूपात कविता आणि अखंड ही लिहितात आणि महाराजांचा फोटो मागवून आपल्या बैठकीच्या खोलीत लावतात तेव्हा महात्मा फुले महाराजा सयाजीराव गायकवाड यांना आपला आदर्श मानत असल्याचे पुरावे त्याचबरोबर मिळतात.

## मराठा जातीचे उद्धारक

आधुनिक महाराष्ट्रात मराठा जातीच्या शैक्षणिक उन्नतीसाठी सर्वप्रथम आणि सर्वाधिक योगदान देणारया

गंगारामभाऊ म्हस्के यांनी १८८३ मध्ये पुण्यात मराठा जातीतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी ‘डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशन’ या संस्थेची स्थापना केली. मराठा जातीतील पहिली उच्च शिक्षण घेतलेली पिढी म्हस्केंमुळे तयार झाली. महाराजांनी या संस्थेला १८८५ ते १९३९ पर्यंत असे ४५ वर्षे अखंडपणे आर्थिक पाठबळ दिले. ही मदत ५ लाख २९ हजार ५५६ रु. इतकी होती. आजच्या रकमेच्या दरात या रकमेचे कमीतकमी मूल्य ७२ कोटी ४५ लाखांहून अधिक भरते.

मराठीतील आद्य शिवचरित्रकार कृष्णराव अर्जुन केळूसकर हे सयाजीरावांच्या प्रेरणेनेच लेखक झाले. महाराजांनी मॅक्स मुल्लरने भाषांतरित केलेल्या ‘सेक्रेड बुक्स ऑफ दी ईस्ट’ या मालेत प्रकाशित केलेल्या बारा उपनिषदांपैकी सात उपनिषदांचा मराठी अनुवाद करण्याची जबाबदारी केळूसकरांवर सोपवली. संस्कृत ग्रंथांवरून थेट मराठीत असे भाषांतर करणारे केळुसकर हे पहिले ब्राह्मणेतर लेखक ठरतात. पुढे १९०६ मध्ये सयाजीरावांनी केळूसकरलिखित ‘छत्रपती शिवाजी महाराज’ या चरित्र ग्रंथास आर्थिक साहाय्य करत या ग्रंथाच्या २०० प्रती विकत घेतल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना प्रथम गौतम बुद्ध समजले आणि अनिवार आकर्षण निर्माण झाले ते केळूसकरांच्या गौतम बुद्धाच्या चरित्रामुळेच.

## विठ्ठल रामजी शिंदे

अस्पृश्योद्धाराचे कार्य जीवनध्येय म्हणून अंगीकारणाऱ्या विठ्ठल रामजी शिंदेंना बी.ए आणि एल. एल. बी. शिक्षणासाठी एकूण ५ वर्ष १,५०० रु. शिष्यवृत्ती दिली. १९०१ मध्ये ऑक्सफर्ड विद्यापीठात धर्माच्या तुलनात्मक अभ्यासासाठी १,५०० रु. प्रवासखर्च ही दिला. १९०५ मध्ये वि.रा शिंदे यांचे 'अस्पृश्योद्धार' या विषयावर बडोद्याच्या न्यायमंदिराच्या  दिवाणखान्यात एक व्याख्यान करवून हेच व्याख्यान 'बहिष्कृत भारत' या स्वतंत्र पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्यात आले. या पुस्तकाच्या १,००० प्रती महाराजांनी विकत घेऊन संस्थानात वाटल्या. १९१८ मध्ये वि.रा शिंदे यांनी मुंबई येथे भरवलेल्या दुसऱ्या अखिल भारतीय अस्पृश्यता निवारण परिषदेचे अध्यक्ष सयाजीराव होते. या परिषदेत भारतातील पहिला अस्पृश्य निवारण ठराव मांडला गेला. यावर पहिली सही करणारी व्यक्ती सयाजीराव होते.

## राजर्षी शाहूंचे मार्गदर्शक आणि आदर्श

शाहू महाराज आणि सयाजीराव या दोघांमधील पुरोगामी संवाद हा १९०० च्या कोल्हापुरातील वेदोक्तापासून ते १९२२ मध्ये शाहूंच्या निधनापर्यंत होता. कोल्हापुरात वेदोक्त प्रकरणाचा प्रश्न टोकाचा झाला तेव्हा शाहूंनी हे प्रकरण हाताळताना सयाजीरावांची मदत घेतली. कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजला मुंबई विद्यापीठाचे कायमस्वरूपी संलग्नीकरणासाठीसुद्धा मदत मागितली. सयाजीरावांचे विश्वासू सहकारी खासेराव जाधवांना

छत्रपती शाहू गुरुस्थानी मानत होते. सयाजीराव आणि शाहू महाराज यांना जोडणारा दुवा अशीच खासेराव जाधवांची भूमिका होती.

शाहूंनी महाराजांशी पत्रव्यवहार करून बडोद्याच्या विविध कायद्यांची मागणी केल्याचे पुरावे सापडतात. बडोद्याचा प्राथमिक शिक्षण कायदा शाहूंनी जसाच्या तसा कोल्हापुरात राबविला तसेच जमीन सुधारणा कायद्याचीही मागणी महाराजांकडे केली. बडोद्यातील शिक्षण खात्यातील पंडित आत्माराम हे बडोद्याच्या सेवेतून कोल्हापुरातील शैक्षणिक काम पाहण्यासाठी हवे असल्याचे पत्र शाहूंनी सयाजीरावांना लिहिले होते. सयाजीरावांचे आर्थिक पाठबळ मिळालेल्या डेक्कन मराठा एज्युकेशन असोसिएशनच्या शिष्यवृत्तीवर शिकलेल्या ३२ व्यक्ती कोल्हापुरात महत्त्वाच्या पदांवर होत्या. यावरून असे दिसते की शाहू महाराजांच्या कार्याला बडोदा आणि सयाजीरावांकडून मिळालेली प्रेरणा, नैतिक पाठबळ आणि सहकार्य हे वादळातील दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करणारे ठरले आहे.

## बाबासाहेबांचे हितचिंतक

डॉ. आंबेडकरांच्या भीमराव ते बाबासाहेब या प्रवासातील खरे वाटाडे म्हणजे सयाजीराव महाराजाच होते. महाराजांनी बाबासाहेबांना पदवी शिक्षणासाठी ५ वर्षांसाठी दरमहा २५ रु. शिष्यवृती मंजूर केली.तसेच अमेरिकेस उच्च शिक्षणासही

पाठविले. १९०८-१९१७ अशी सलग ९ वर्षे संपूर्ण शिक्षणासाठी आर्थिक साहाय्यही केले. १९३१ साली दुसऱ्या गोलमेज परिषदेवेळी महाराजांनी आंबेडकरांना अस्पृश्य उद्धाराच्या कार्यासाठी १५० पौंडांची आर्थिक मदतही केली. बाबासाहेबांना वेळोवेळी महाराजांनी केलेली ही आर्थिक मदत आजच्या मूल्यात ४ कोटी ९४ लाख २३ हजार ८३९ रुपये इतकी भरते.

घटनासमितीचे सदस्य म्हणून काम करत असताना महाराजांसमोर बडोद्यातील कायद्यांचा नमुना होता. जगातील एकमेव अशा पुरोहित कायद्याचा तसेच बडोद्यातील हिंदू कोड बिलाचा उपयोग घटना निर्मितिवेळी बाबासाहेबांकडून करण्यात आला. सयाजीरावांच्या या कायद्यांनी भारतीय राज्यघटनेस नक्कीच ऊर्जा पुरवली.

१९३९ रोजी झालेल्या महाराजांच्या मृत्यूनंतर 'जनता' या वृत्तपत्रातील मृत्युलेखात आंबेडकर लिहितात, "सयाजीराव महाराजांच्या निधनाने माझी वैयक्तिक फार मोठी हानी झाली आहे. त्यांचे उपकार मी केव्हाही विसरणार नाही. त्यांनी जे शिक्षण दिले त्यामुळे मला आजची योग्यता प्राप्त झाली आहे. अस्पृश्य जातीवर त्यांचे फार मोठे उपकार आहेत. त्यांच्या इतके अस्पृश्य जातीसाठी दुसऱ्या कोणीही कार्य केले नाही." त्यामुळेच डॉ. आंबेडकरांच्या भीमराव ते बाबासाहेब म्हणून घडलेल्या प्रवासामागे महाराजांची असणारी दूरदृष्टी योगदान लक्षात घेऊन सयाजीराव  आणि आंबेडकर हे नाते नव्याने अभ्यासने गरजेचे आहे.

## कर्मवीरांची प्रेरणा

शैक्षणिक कार्यासाठी सयाजीरावांकडून मिळालेल्या प्रेरणेविषयी कर्मवीर भाऊराव पाटील म्हणतात, “१९०६ ला मी सयाजीराव महाराजांचं अंत्यज्योध्दारासंबंधीचं भाषण वाचलं आणि निश्चय केला, हेच काम आजन्म करायचं. गरीब व मागासवर्गीय मुलांच्या शिक्षणाचं काम वसतिगृहाच्या माध्यमातून सुरू केलं.” १९३९ मध्ये जेव्हा सयाजीरावांच्या मृत्यूनंतर त्यांचे स्मरण म्हणून कर्मवीरांनी १९४० मध्ये सातारा येथे महाराजा सयाजीराव गायकवाड हायस्कूल सुरू केले. सामाजिक कार्य करण्यासाठी जाणीवपूर्वक मनुष्यबळ तयार करण्याचा महाराजांचा अंतस्थ हेतू यातून सफल झाल्याचे दिसते.

१ ऑगस्ट १८९८ रोजी छोट्याशा जागेत स्थापन झालेले मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाचे महाराष्ट्रीयन ग्रंथालय चळवळीतील स्थान महत्त्वपूर्ण आहे. या संस्थेच्या नवीन इमारतीची १७ डिसेंबर १९१० रोजी पायाभरणी आणि ७ नोव्हेंबर १९१२ रोजी या इमारतीचे उद्घाटन हे दोन्ही कार्य महाराजांच्या हस्तेच झाले. या ग्रंथालयाच्या उभारणीसाठी सयाजीरावांनी १,००० रु.चे आर्थिक साहाय्य केले. आजच्या रुपयाच्या मूल्यात ही रक्कम अंदाजे ५० लाख हून अधिक भरेल. आज मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती याचा मानदंड असणाऱ्या मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाची उभारणी करून महाराजांनी आधुनिक

महाराष्ट्राच्या जडणघडणीत ऐतिहासिक योगदान दिले आहे. दुर्दैवाने मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या अधिकृत वेबसाइटवर महाराजांच्या या योगदानाचा उल्लेख आढळत नाही.

या प्रयत्नांचा परिपाक म्हणूनच सयाजीराव महाराजांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त १९३३ मध्ये पुण्यातील नगरवाचन मंदिर, मराठी ग्रंथ संग्रहालय, महाराष्ट्र साहित्य परिषद, अखिल महाराष्ट्र साहित्य मंदिर आणि कोल्हापूरमधील महाराष्ट्र साहित्य संमेलन कचेरी अशा ७४ सार्वजनिक संस्थांतर्फे महाराजांचा सत्कार करण्यात आला. हा सत्कार म्हणजे महाराजांच्या महाराष्ट्रीयन ग्रंथालय चळवळीला असणाऱ्या अपूर्व योगदानाचा भक्कम पुरावा आहे.

## लेखक सयाजीराव

इतरांकडून चांगले वाङ्मय तयार करून घेत असतानाच महाराज स्वतःसुद्धा दर्जेदार लेखन करत होते.एडवर्ड गिब्बनच्या 'रोमन साम्राज्याचा उत्कर्ष व ऱ्हास' या ग्रंथाचा सयाजीरावांनी लिहिलेला इंग्रजी टीका ग्रंथ 'From Caesar To Sultan' या नावाने प्रसिद्ध झाला. या ग्रंथाचे 'कैसरकडून सुलतानकडे' हे मराठी भाषांतर राजारामशास्त्री भागवत यांनी केले. सयाजीरावांचा १९०१ साली प्रकाशित दुष्काळ निवारणासंदार्भात उपाय सुचवणारा 'Notes On The Famine Tour' हा ग्रंथ म्हणजे कोणत्याही भारतीय प्रशासकाने दुष्काळावर लिहिलेला पहिला ग्रंथ आहे.

कोल्हापूर साहित्य संमेलनाचे अध्यक्षस्थान भूषविताना संधिवाताचा त्रास वाढल्यामुळे महाराज या संमेलनास उपस्थित राहू शकले नाही. परंतु त्यावेळचे बडोद्याचे हुजूर कामदार आर.एस. माने-पाटील यांनी महाराजांच्या वतीने संमेलनास उपस्थित राहून महाराजांचे अध्यक्षीय भाषण वाचून दाखवले. या भाषणाच्या सुरुवातीलाच महाराज सांगतात, 'मी मराठी, गुजराथी, हिंदी भाषेतील सर्व प्रकारच्या वाङ्मयाच्या वाढीसाठी गेली ५० वर्षे मदत करत आहे. या वाङ्मयांच्या वाढी का खुरडतात याचा अभ्यास करण्यात मी दीर्घकाळ घालविला आहे.' आज महाराजांचे हे विचार वाचताना आपण थक्क होतो. कारण साहित्याच्या उत्कर्षासाठी राज्यकर्त्याने हातभार लावणे हे एकवेळ आपण समजू शकतो. परंतु या वाङ्मयाची वाढ का होत नाही याचा विचार जेव्हा सयाजीराव करतात तेव्हा ही बाब आजही साहित्य क्षेत्रातील धुरिणांना आत्मटीकेकडे घेऊन जाते.

या भाषणात विविध प्रांतातील साहित्याचे इतर भाषांमध्ये भाषांतर करण्याची महाराजांनी सूचना केली. लोकांनी आपल्या साहित्याची इतर प्रांतातील साहित्याशी तुलना करून आपण आणि आपले साहित्य नेमके कुठे आहे हे समजून घ्यावे अशी भूमिका मांडली. स्वातंत्र्यानंतर १२ मार्च १९५४ रोजी भारतात स्थापन झालेल्या 'भारतीय साहित्य अकादमी' या महत्त्वाच्या आणि १७ भारतीय भाषेत साहित्य प्रकाशित करणाऱ्या संस्थेची बीजे या भाषणात सापडतात. यावरून महाराजांनी केलेले चिंतन

आणि मांडलेली भूमिका किती द्रष्टी होती हे वेगळे सांगण्याची गरज नाही. तुकारामाचे अभंग संगतवार लावून प्रसिद्ध केल्यास तो एक जागतिक महत्त्वाचा अपूर्व ग्रंथ होईल असे जेव्हा महाराज सांगतात तेव्हा तुकारामाच्या तत्त्वज्ञानाच्या वैश्विक मूल्याचे महाराजांचे भान किती प्रगल्भ होते याचा पुरावा मिळतो.

## मराठी भाषेचे 'खरे' शिवाजी

मराठीतील एक महत्त्वाचे साहित्यिक आणि समीक्षक भालचंद्र नेमाडे यांनी अत्यंत मार्मिकपणे मराठी साहित्य आणि सयाजीराव यांचे नाते अधोरेखित केले आहे. नेमाडे म्हणतात, "आपली भाषा ज्ञानाच्या बाबतीत आत्मनिर्भर असावी, असे सर्वांनाच वाटते. परंतु यासाठी सत्तेवरच्या लोकांना आणि विद्याक्षेत्रातल्या लोकांना सतत कष्ट उपसावे लागतात. विद्याक्षेत्रातल्या सुखवस्तू होऊन आळशी बनलेल्या लोकांना ज्ञानग्रंथ निर्माण करण्याच्या मेहनती कामाला लावणे किती कठीण असते. सयाजीरावांनी हा सर्व प्रयोग यशस्वी करून शेकडो ग्रंथ मराठीत निर्माण केले. मातृभाषेचा एवढा जिव्हाळा त्यांच्यानंतर सत्तेवरच्या दुसऱ्या कोणी मराठी माणसाने दाखवलेला नाही."

मराठी भाषेचे शिवाजी ही उपाधी विष्णूशास्त्री चिपळूणकर यांना मोठ्या अभिमानाने लावली जाते. चिपळूणकरांनी संस्कृतप्रचुर मराठी भाषेचा आग्रह धरला. त्यांचा हा आग्रह ब्राह्मणांचे वर्चस्व आणि बहुजनांचे दुय्यमत्व अधोरेखित

करणारा होता. शिवाजी महाराजांच्या सर्वसमावेशकतेलासुद्धा तो उभा छेद देणारा होता. एकप्रकारे शिवाजी महाराजांच्या सर्वसमावेशकतेला कमीपणा आणणारा होता. म्हणूनच सयाजीरावांचे या क्षेत्रातील कार्य विचारात घेता ही उपाधी चिपळूणकरांपेक्षा सयाजीरावांना लावणे जास्त प्रामाणिकपणाचे ठरेल.

●●●

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर - दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव - डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूसकर - सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई - दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील - शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह - देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद - डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा - राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती - निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर - सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा - राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
- धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
- धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
- सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
- दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
- डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
- सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
- पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
- बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सयाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
- बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :

**❐ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**मराठी :**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**English**

- Specchess & Adresses : 2 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- World Tour Reports : 3 Books
- Biographies : 5 Books
- Letters : 4 Books
- Administration : 1 Books
- Education Reforms : 3 Books
- Total English Books : 20

**हिन्दी :**

- सयाजीराव का लेखन : १
- सयाजीराव जीवनी : २
- पत्र संग्रह : ३
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- भाषण संग्रह : २
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद

कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाचे महाराजा सयाजीरावांचे वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

●●●

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
महाराजा सयाजीराव ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com